महाराष्ट्र शासन
पोलीस अधीक्षक कार्यालय लोहमार्ग, छत्रपती संभाजीनगर
दुरध्वनी क्र. : ०२४०-२३९२१०० भारतमाता चौक, पोलीस कॉलनी रोड, डीसीटीसी इमारत, छत्रपती संभाजीनगर४३१००१
Email ID - cybercrime.rly-abad@mahapolice.gov.in

दिनांक :- २०/ ०२ /२०२६

## प्रेस नोट

पोलीस अधीक्षक कार्यालय, लोहमार्ग छत्रपती संभाजीनगर
दिनांक : २०/०२/२०२६

**विषय-** लोहमार्ग छत्रपती संभाजीनगर पोलीस शिपाई भरती २०२४—२५ : २० फेब्रुवारी पासून मैदानी चाचण्यांना सुरुवात...

पोलीस अधीक्षक कार्यालय, लोहमार्ग छत्रपती संभाजीनगर आस्थापनेवरील पोलीस शिपाई भरती २०२४—२५ अंतर्गत उमेदवारांची मैदानी चाचणी प्रक्रिया दिनांक २०/०२/२०२६ पासून सुरू झाली आहे, ही संपूर्ण प्रक्रिया गोकुळ पोलीस कवायत मैदान, एन–१०, पोलीस अधीक्षक कार्यालय, टी.व्ही. सेंटर, पोलीस मुख्यालय, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण येथे पार पडणार आहे.

या भरती प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर मा. स्वाती भोर, पोलीस अधीक्षक यांनी संपूर्ण नियोजनाचा सखोल आढावा घेतला असून, भरती प्रक्रिया सुलभ, पारदर्शक, गुणवत्ताधिष्ठित व विश्वासार्ह पद्धतीने पार पाडण्यासाठी पोलीस अधिकारी, अंमलदार तसेच कार्यालयीन अधिकारी व कर्मचारी यांना सुस्पष्ट सूचना व मार्गदर्शन केले आहे.

पोलीस अधीक्षक, लोहमार्ग छत्रपती संभाजीनगर ग्रामीण आस्थापनेसाठी पोलीस शिपाई एकूण ९३ पदांसाठी ही भरती होत असून, त्यापैकी २८ पदे महिलांसाठी राखीव आहेत. या भरतीसाठी पोलीस शिपाई पदाकरिता ४३९१ अर्ज प्राप्त झाले आहेत.

ही भरती प्रक्रिया तटस्थ, नि:पक्षपाती व पारदर्शक राहणार आहे. तसेच मा. स्वाती भोर, पोलीस अधीक्षक व मा. संजय लोहकरे, पोलीस उप-अधीक्षक यांनी अत्यंत बारकाईने व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून या भरती प्रक्रियेचे नियोजन केले आहे.

शारीरिक व मैदानी चाचण्यांची संपूर्ण व्हिडीओग्राफी केली जाणार असून, मैदान परिसरात CCTV कॅमेरे बसविण्यात आले आहेत. उमेदवारांची नोंदणी बायोमेट्रिक स्कॅनद्वारे केली जाणार असून, RFID प्रणाली व छातीवर लावण्यात आलेल्या बारकोडच्या माध्यमातून १०० मीटर व १६००/८०० मीटर धावण्याचा अचूक वेळ नोंदवून गुणांकन करण्यात येणार आहे.

मा. पोलीस अधीक्षक यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले आहे की, उमेदवारांची निवड ही फक्त गुणवत्तेच्या आधारे केली जाणार आहे. कोणत्याही एजंट, दलाल, अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांच्या आमिषाला बळी पडू नये. या प्रक्रियेत कोणाचाही वशीला, ओळख किंवा दबाव चालणार नाही. कोणीही भरती करून देतो असे प्रलोभन देत असल्यास तात्काळ वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा.

भरती प्रक्रियेदरम्यान उमेदवारांना अस्वस्थता वाटल्यास किंवा जखमी झाल्यास तत्काळ उपचारासाठी डॉक्टरांची टीम व रुग्णवाहिका उपलब्ध ठेवण्यात आली आहे. तसेच उमेदवारांसाठी पिण्याचे पाणी व टॉयलेट व्हॅनची व्यवस्था करण्यात आली आहे.

सदर भरती प्रक्रियेसाठी पात्र उमेदवारांनी खालील सर्व सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन पोलीस अधीक्षक, लोहमार्ग छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

मैदानी चाचणीसाठी सर्व उमेदवारांनी त्यांच्या प्रवेशपत्रावर नमूद केलेल्या दिनांकास गोकुळ मैदान, पोलीस मुख्यालय, टी.व्ही. सेंटर रोड, सिडको एन–१०, छत्रपती संभाजीनगर येथे वेळेत उपस्थित राहणे बंधनकारक आहे. उमेदवारांनी सकाळी ०५:०० ते ०९:०० वाजेपर्यंत उपस्थित रहावे. बाहेरगावाहुन येणा-या उमेदवारांसाठी मैदानी चाचणीच्या एक दिवस अगोदर रात्री पोलीस अधिक्षक छत्रपती संभाजीनगर ग्रामीण कार्यालयाच्या बाजुस असलेल्या कैलास शिल्प सभागृह येथे मुकामाची सुविधा विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

Scanned with OKEN Scanner

उमेदवारांनी प्रवेशपत्रावर फोटो चिटकवून, तीन अतिरिक्त फोटो, आवेदन अर्ज, अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रांची छायांकित प्रत तसेच शासनाने जारी केलेले आधारकार्ड, पॅनकार्ड, मतदानकार्ड, पासपोर्ट, वाहन परवाना, महाविद्यालयीन ओळखपत्र यापैकी कोणतेही एक मूळ व वैध ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक आहे. प्रवेशपत्राशिवाय मैदानी चाचणीत प्रवेश दिला जाणार नाही.

भरती प्रक्रियेदरम्यान मोबाईल फोन, सर्व प्रकारची इलेक्ट्रॉनिक उपकरणे किंवा प्रतिबंधित वस्तू बाळगण्यास सक्त मनाई आहे. अशा वस्तू आढळल्यास संबंधित उमेदवारावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

मैदानी किंवा शारीरिक चाचणीत गैरहजर राहणाऱ्या उमेदवारास कोणतीही पुढील संधी देण्यात येणार नाही. भरती प्रक्रियेदरम्यान गैरवर्तन, वशिलेबाजी, भ्रष्ट आचरण, उत्तेजक द्रव्य सेवन किंवा डमी उमेदवाराचा वापर केल्याचे आढळल्यास उमेदवारास तात्काळ अपात्र ठरवून फौजदारी कारवाई करण्यात येईल.

शारीरिक चाचणी दरम्यान स्पाईक (खिळेयुक्त) शूज/बूट वापरण्यास पूर्ण मनाई आहे. चाचणीदरम्यान झालेल्या कोणत्याही शारीरिक दुखापतीस उमेदवार स्वतः जबाबदार राहील. तसेच पूर्वपरवानगीशिवाय मैदान सोडण्यास मनाई राहील.

उमेदवारांनी ऑनलाईन अर्जामध्ये खोटी माहिती किंवा बनावट कागदपत्रे सादर केल्यास कोणत्याही टप्प्यावर उमेदवारी रद्द करण्यात येईल. भरती प्रक्रियेत भाग घेणाऱ्या उमेदवारांनी कोणत्याही एजंट किंवा दलालांच्या भुलथापांना बळी पडू नये. उमेदवारांची निवड केवळ गुणवत्तेच्या आधारे करण्यात येईल.

उमेदवारांनी दिनांक २८/१०/२०२५ रोजी प्रसिद्ध जाहिरातीतील सर्व सूचनांचे पालन करणे बंधनकारक आहे. भरती प्रक्रियेदरम्यान अपरिहार्य कारणास्तव बदल करण्याचा अधिकार पोलीस भरती निवड मंडळाकडे राखून ठेवण्यात आला आहे.

आवश्यक कागदपत्रे

१. ऑनलाईन प्राप्त झालेले ०२ रंगीत प्रवेशपत्र
२. आवेदन अर्जाची ०१ छायांकित प्रत
३. आधारकार्डची ०१ छायांकित प्रत
४. पासपोर्ट आकाराचे ०४ रंगीत फोटो

संपर्क क्रमांक

श्री. संजय लोहकरे
पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय),
लोहमार्ग छत्रपती संभाजीनगर
दूरध्वनी : ०२४०-२३९०१००

श्रीमती. स्वाती भोर
पोलीस अधीक्षक,
लोहमार्ग छत्रपती संभाजीनगर
दूरध्वनी : ७४९९९३८५८५

(स्वाती भोर)
पोलीस अधिक्षक
लोहमार्ग छत्रपती संभाजीनगर

Scanned with OKEN Scanner